# महागाई ! महागाई !!

**लता भिसे**

---

दुधाच्या दरात मुंबईत वाढ ! स्वयंपाकासाठी जळण म्हणून वापरल्या [illegible] गॅसच्या दरात वाढ ! रोजगार हमी मजुरांना दिल्या जाणाऱ्या गव्हात कपात, काही ठिकाणी गहू मिळत नाही ! फी वाढ ! रॉकेल, साखर, धान्य दरात वाढ ! रॉकेल गडप ! गेल्या ७-८ महिन्यात या बातम्या सतत येणाऱ्या ! बलात्कार, अत्याचार, दडपशाही या प्रश्नाबरोबरच सर्वसामान्य माणसाला पावलोपावली भेडसावणारा प्रश्न म्हणजे महागाई! आणि विषशेत: स्त्रियांना फार भेडसावणारा! घरचं काम बाहेरचं काम संभाळून रेशनच्या रांगेत उभं रहायचं, तुटपुंज्या कमाईत घरखर्च भागवायचा ही कामं स्त्रियांनाच करावी लागतात! आणि म्हणूनच महागाईशी त्यांचा जवळून संबंध येतो. ही महागाई का होते ? कशी होते ? ती दूर करायला उपाय नाहीतच का ? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे रहातात महागाईचा प्रश्न हा सर्वांना ग्रासणारा आहे. हिंदु-मुस्लिम-ख्रिश्चन-दलित-सवर्ण-कनिष्ठ व मध्यमवर्गीय बुद्धीजीवी, कामगार, शेतकरी, शेतमजूर सर्वांनाच हा प्रश्न भेडसावतो आहे. म्हणून सर्वांनीच या प्रश्नावर विचार करायला हवा !

का होते बरे ही महागाई? असा प्रश्न विचारला की कुणी म्हणतं समाजाला भ्रष्टाचार माजलाय म्हणून महागाई होते. कोणी म्हणतं हे कलीयुग आहे, कोणी म्हणतं आपलं नशीब वाईट आहे म्हणून महागाई आहे. दुकानदाराला विचारलं की दुकानदार म्हणतो,'व्यापारी मला महाग देतात, मी काय करणार ?' व्यापारी म्हणतो, 'कारखानदार मला महाग देतात, मी काय करणार ?' कारखानदाराला विचारलं की कारखानदार म्हणतो, 'कामगार मला पगारवाढ मागतात म्हणून मी महाग देतो.' कामगार म्हणतो, 'मला बाजारात वस्तू स्वस्त मिळत नाही, पगारात भागत नाही, मालकाचे बघा, किती नफा कमावतो'... म्हणजे चेंडू या कोर्टातून तिकडे फेकणे चालले आहे. म्हणून महागाईची कारणे आपल्याला शोधायला हवीत. महागाई होण्याला कामगार खरोखरच जबाबदार आहेत की श्रीमंतांचे शासन याचा शोध घ्यायला हवा. कामगार पगारवाढ मागतात म्हणून आणि संपामुळे उत्पादन कमी होते, म्हणून महागाई वाढते, म्हणून ४२ उद्योगधंद्यातील कामगारांना संप बंदी करणारे विधेयक सरकारने आणले आहे. तरीही महागाई गेलीच नाही. म्हणून महागाईच्या कारणांचा वरवर शोध न घेता अधिक खोलवर जाऊन आपल्याला शोध घ्यायला हवा.

## अप्रत्यक्ष करामुळे महागाई

महागाई वाढते याचे सर्वात पहिले प्रमुख कारण म्हणजे सरकार अप्रत्यक्ष कर आकारते ! दर वर्षी आपल्या देशात केन्द्र सरकार, राज्य सरकार अर्थसंकल्प म्हणजे बजेट जाहीर करतात. त्यावेळी खर्चाचा व जमेचा अंदाज जाहीर केला जातो. जमेच्या रक्कमेमध्ये करापासून येणारी रक्कम असते. कर दोन प्रकारचे असतात– १) प्रत्यक्ष कर, २) अप्रत्यक्ष कर. म्हणजे उत्पान्नावरील कर. एखाद्या व्यक्तिचे उत्पन्न विशिष्ट मर्यादेपलिकडे गेले तर त्या उत्पन्नावर कर बसतो. हा प्रत्यक्ष कर अति श्रीमंत व्यक्तिपासून जरा बरी आर्थिक स्थिती असलेल्या लोकांवरही बसतो. दुसऱ्या प्रकारचा कर म्हणजे अप्रत्यक्ष कर. आयात केलेल्या वस्तूवरचा कर, अबकारी कर, विक्री कर हे अप्रत्यक्ष कर आहेत, आपण बाजारात वस्तू खरेदी करत असताना हे कर घेतले जातात. वास्तविक हे कर कारखानदारावर, व्यापाऱ्यांवर असतात. पण ते कर कारखानदार, व्यापारी ग्राहकाच्या खिशातून काढून सरकारला भरतात. म्हणजे थोडक्यात कारखानदार स्वत:च्या खिशातून न भरता हा कर आपल्याकडून म्हणजे ग्राहकाकडून वसूल करतो. म्हणजे नफा मिळवणाऱ्या कारखानदारावरील कराचा बोजा वाढण्याऐवजी ग्राहकावरच वाढतो. गरीबावरचा कराचा बोजा वाढतो. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीबाच्या फाटक्या झोळीला अधिक फाटके बनवले जाते. जीवनाश्यक वस्तूवरील कर सरकारने रद्द करायला हवेत.

अर्थात सरकारने असे कर वाढवले की सरकारला जागृत संघटना जाब विचारतातच. मग सरकार सांगते की आम्हाला जनतेच्या विकासाची कामे करायची आहेत. पण आज स्वातंत्र्य मिळून ३४ वर्षे झाली किती विकास झाला? गरीबाला घरे मिळाली? पोटभर अन्न मिळते? चांगला कपडा लत्ता, शिक्षण, औषधपाणी मिळते का? नाही. म्हणजे कराचा वापर विकासासाठी झाला का? आपल्याकडून कर वसूल करून मोठ्या कारखानदारांना कर्जे दिली जातात. आपल्यावरचे अप्रत्यक्ष कर वाढवले जातात श्रीमंतांवरच्या प्रत्यक्ष करात मात्र त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. आणि श्रीमंतांना कर बसविण्यासाठी ज्या कायदेशीर तरतूदी आहेत त्यात भरपूर पळवाटा आहेत. फॅक्टरी ॲक्ट, जमीन वाटप कायदा, कर्ज माफी, इ. कायद्याची उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेतच. सरकारच्या एकूण उत्पन्नात अप्रत्यक्ष करापासून मिळणारे उत्पन्न प्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. म्हणजे श्रीमंतांना अधिक श्रीमंत होण्याची मुभा अधिक आहे.

महागाई होण्याचे आणखी एक कारण म्हणजे चलन फुगवटा. उत्पादनापेक्षा अधिक नोटा छापल्या की चलन फुगवटा होतो. हा चलन फुगवटा होतो तुटीच्या अंदाज पत्रकामुळे. भरपूर कर आकारूनही जेव्हा पैशाचा तुटवडा येतो तेव्हा तूट भरून काढण्यासाठी सरकार नोटा छापते. बाजारात पैशाचा पुरवठा आहे पण वस्तूचा पुरवठा नाही मग भाववाढ होते. तूट येते कारण बँकाही श्रीमंताना कर्जपुरवठा करतात. या कर्ज पुरवठ्याचा वापर साठेबाजीसाठी होतो. तुटीची अंदाज पत्रके व बँकांनी वाटलेली कर्जे यामुळे बाजारातील पैशाचा पुरवठा वाढतो व उत्पादन कमी आहे त्यामुळे वेगाने भाववाढ होते. आज तुटीचे अंदाजपत्रक येते कारण सरकारी क्षेत्रातील कारखान्यातील उत्पादन खाजगी भांडवलदारांना स्वस्त दरात पुरवले जाते. दुसरी गोष्ट म्हणजे शेती क्षेत्रात सरकार गुंतवणूक करते. बडे शेतकरी जमीनदार ह्यांना फायदा होतो. पण ते कर चुकवेपणा करतात. आज तुटीच्या अर्थ संकल्पाचे कारण म्हणजे भांडवलदार–जमिनदार धार्जिणे धोरण आहे.

## अनुत्पादक खर्चाचे प्रमाण जास्त

आज सैन्य, पोलीस यावर अतोनात खर्च होतो. अनेक ठिकाणी दारिद्र्य, अन्याय, अत्याचार दडपशाही याविरोधी लढे चालले आहेत. हे लढे दडपण्यासाठी राखीव पोलीस, पोलिसदले उभी केली जातात. पोलिसांवर खर्च होऊनही सर्व सामान्यांना संरक्षण मिळत नाहीच. संरक्षण शासकानाच मिळते. हा खर्च अनुत्पादक खर्च आहे.

दरवर्षी पूर दुष्काळ होतात. पूर दुष्काळाची क्षेत्रे ठरली आहेत. ती सर्व माहीत असूनही त्या भागात वरवरची मलमपट्टी करून लक्षावधी रुपये उधळले जातात. त्या भागात कायमची सुधारणा घडत नाही. उदा० म्हणजे उत्तर भारतातील पूर परिस्थिती. समाजवादी देशात पूर, दुष्काळ यावर मानवी प्रयत्नातून सहज यश मिळवले आहे.

सरकारी कर वाढ, चलन फुगवटा, अनुत्पादक खर्चाचे वाढते प्रमाण याबरोबरच बड्या व्यापाऱ्यांच्या साठेबाजीमुळेही महागाई होते.

आपली अर्थव्यवस्था स्वावलंबी नाही. ती जगातील भांडवली अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. जगभरच्या भांडवली देशात भाववाढ आहे. इतर देशातील वस्तू आयात करताना आपण त्यांच्या देशातील भाववाढही आयात करत असतो.

आजची अर्थव्यवस्था कष्टकरी जनतेचे हितसंबंध संभाळत नाही तर भांडवलदार जमीनदारांच्या हितसंबंधांसाठी ती राबविली जाते. आपल्या सर्वांना या अर्थव्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणायचे आहेत आणि त्याचाच एक भाग म्हणून महागाई विरोधात धर्म, जाती, पंथ, भेद विसरून एकत्र यायला हवे. महागाई विरोधी आंदोलन उभे करायला हवे.

दिल्ली आणि मुंबईमध्ये महिलांनी महागाई विरोधी कंबर कसली आहे! १३ ऑगस्टला पुण्यात झालेल्या कामगार परिषदेतही महागाईचा विचार झाला आहेच.

## महागाई विरोधी घोषणांनी मंत्रालय दणालले

मुंबईमध्ये महागाई प्रतिकार संयुक्त समिती आहे. यामध्ये श्रमिक महिला संघ, अखिल भारतीय महिला

परिषद, समाजवादी महिला मंच इ. संघटनांचा पुढाकार आहे. महागाई प्रतिकार संयुक्त समितीने मुख्यमंत्री अंतुले यांच्याशी तीनदा वेळ ठरवून घेतली. पण प्रत्येक वेळी दीड तास ताटकळत ठेवले व भेटही दिली नाही. शेवटी १० जूनला मंत्रालयामध्ये मंत्रिमंडळाची बैठक चालू असतानाच समितीने आपल्या मागण्यांची दाद मागण्याचे ठरवले व बैठक चालू असतानाच मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर जाऊन महागाई विरोधी घोषणांनी सचिवालय दणाणून सोडले. मंत्रीमंडळाची बैठक सुरू असलेल्या दालनाच्या बाहेर महिलांनी घोषणा देण्यास सुरूवात करताच पोलिसांनी निदर्शकांना खाली खेचण्याचा प्रयत्न केला. अहिल्या रांगणेकर ह्यांना लिफ्टपर्यंत फरफटत नेण्यात आले. महिलांची निदर्शने दुपारी १२ वाजता होती पण तेथे महिला पोलीस नव्हत्या. निदर्शकांमध्ये अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, मंजू गांधी, तारा रेड्डी, कमल देसाई इत्यादिंचा समावेश होता. ३२ महिला निदर्शकांना अटक करण्यात आली.

सर्वसाधारपणे माजी खासदार, आमदार, नगरसेवक यासारख्या लोकप्रतिनिधींना वैयक्तिक जामीनावर सोडण्याची आत्तापर्यंत पद्धत होती पण पोलिसांनी दहा तारखेला कोणालाही वैयक्तिक जामीनावर सोडण्यास नकार दिला. या सर्व महिलाविरुद्ध केस दाखल केली आहे.

## महागाई विरूद्ध राजधानीत महिलांनी कंबर कसली !

सध्या देशभर महागाई विरुद्ध आवाज उठवला जात आहे. राजधानी दिल्लीमध्ये २१ जुलैला बऱ्याच महिला संघटना महागाई विरूद्ध लढा देण्यासाठी एकत्र आल्या आहेत. १. नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमेन २. ऑल इंडिया डेमोक्रॅटीक विमेन्स असोसिएशन. ३. स्त्री संघर्ष. ४. ॲक्शन इंडिया. ५. जनवादी महिला समिती. ६. सेंटर फॉर विमेन्स डेव्हलपमेन्ट स्टडीज. ७. मानुषी. ८. ऑल इंडिया को ऑर्डिनेशन कमिटी ऑफ वर्किंग विमेन. ९. कॉंग्रेस (अर्स) महिला समिती या संघटना या समितीत एकत्र आल्या आहेत. या संघटनांनी एकत्र येऊन जो ठराव केला त्या ठरावात म्हटले आहे, 'केंद्र शासनाने नुकतीच पेट्रोलियम उत्पादित वस्तूमध्ये वाढ केली आहे; त्यामुळे अनेक गरजेच्या वस्तू सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. सर्वसामान्य स्त्रीला कुटुंबातील सर्व खर्चावर लक्ष ठेवावे लागते रॉकेलमधील दरवाढ गॅसमधील भाववाढ यामुळे स्त्रियांना बऱ्याच गोष्टी सोसाव्या लागतात.

संपबंदी वटहुकूमाच्या रूपाने कष्टकरी वर्गावर हल्ल्याला सुरूवात झाली आहे. देशामध्ये धान्याचे साठे मुबलक असताना अन्नधान्य आयात का केले जात आहे? पाश्चात्य मदतीवर विशेषतः अमेरिकन साम्राज्यशाहीवर अवलंबून रहाणे चालले आहे. चलन वाढीविरूद्ध शासनाकडून आज जी उपाय योजना केली जात आहे ती उपाय योजना नसून उपाय योजनेच्या नावाखाली कष्टकरी वर्गावर हल्ले करणे चालू आहे. म्हणून आम्ही सर्व महिला संघटनांना व्यक्तिना आवाहन करतो की शासनाने जी आर्थिक धोरणे घेतली आहेत ती बदलण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन त्याचा प्रतिकार करावा व ती बदलण्यास शासनाला भाग पाडावे.

या समितीतर्फे आता विविध स्वरूपात महागाई, शासनाचे आर्थिक धोरण याविरूद्ध मोहिमा घेण्यात येणार आहेत. अर्थ मंत्रालयासमोर महिला निदर्शन करीत असताना सुमारे १५० महिला सत्याग्रहींना अटक करण्यात आली. मुंबईमध्ये खा. प्रमिला दंडवते, व इतरांना दूधवाटप विरोधी आंदोलन करताना अटक करण्यात आली.

थोडक्यात काय? संपबंदी आली तरी किंवा काळ्या पैशावर चार–दोन धाडी शासनाने घातल्या तरी भाववाढ थांबत नाही. त्यासाठी भाववाढ विरोधात आपल्याला उभे राहिले पाहिजे. दिल्ली, मुंबईतील महिलांप्रमाणे आंदोलने उभी करायला पाहिजेत.